**Bachelor of Arts (B.A.) Sixth Semester Examination**

**MARATHI (Literature)**

**Optional Paper—1**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

1. 'गरूडझेप' या आत्मकथनातून चित्रित झालेला संघर्ष सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

भरत आंधळे यांच्या सामाजिक परिस्थितीचा सविस्तर आढावा घ्या. 16

2. 'ज्ञानदेवे रचिला पाया' ही उक्ती सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

शाहिरी काव्याचे दोन प्रकार कोणते ? त्याविषयी सविस्तर लिहा. 16

3. खालीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** अवतरणांचा संदर्भासह अर्थ स्पष्ट करा :

**गट 'अ'**

(क) "गाढवा ! एवढा मोठा टोणगा झालास, अजून बेचे पाढे येत नाहीत."

(ख) "तुझी माझ्यासमोर काय लायकी आहे, मी म्हणजे सरकार आहे ?"

(ग) "आता तरी कुठंतरी चिटकून हो, लग्न जमलंय, वाटल्यास आपण पैसे भरू, एखादे वावर गहाण ठेवू."

(घ) "काय कलेक्टरसाहेब नांगर धरलाय का ?"

**किंवा**

**गट 'ब'**

(च) "भाऊ, घरातला पहिलाच शिकणारा मुलगा आहे, कसंतरी सातवी-आठवीपर्यंत ओढून घ्या, कुठंतरी कंपनीत कामाला लागेल."

(छ) "अरे वेड्यांनो, कालच या वडाच्या झाडाला एकानं फाशी घेतली आहे. दुसरीकडं जा."

(ज) "गावची लोकसंख्या दहा हजार आणि इथं उपस्थित फक्त चारशेच याची लाज वाटायला हवी."

(झ) "माझी चूक झाली, मला माफ करा. तुम्ही चांगलं काय करताय हे माझ्या लक्षातच आलं नाही. पण साहेब माझे जर आता वय असते ना तर मी खूप अभ्यास केला असता." 16

4. खालीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नाची उत्तरे थोडक्यात लिहा :

**गट 'क'**

(प) 'रूपिका' व 'शब्द' यातील फरक स्पष्ट करा.

(फ) रूपिमाचे दोन प्रकार कोणते ?

(ब) बोलीसंबंधी कोणते गैरसमज पसरले आहेत ?

(भ) कालिकभेद म्हणजे काय ?

**किंवा**

## गट 'ड'

(य) भाषेची दुहेरी रचना स्पष्ट करा.

(र) रूपिकांचे रूपिमात कसे वर्गीकरण होते ?

(ल) प्रमाणभाषा व बोली यांतील परस्पर-संबंध स्पष्ट करा.

(व) बोलींच्या निर्मितीची कारणे कोणती ? 16

5. खालील **सर्व** प्रश्नांची संक्षिप्त स्वरूपात उत्तरे लिहा :

(1) भरत आंधळे यांच्या आवडीचा दिवस कोणता ?

(2) 'आंधळेना' शिकण्यासाठी कुणी प्रोत्साहित केले ?

(3) 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाची निर्मिती ज्ञानदेवांनी कधी, कुठे व वयाच्या कोणत्या वर्षी केली ?

(4) संत चोखामेळा यांची समाधी कुठे आहे ?

(5) 'शाहिरी काव्य' लिहिणाऱ्या तीन शाहिरांची नावे लिहा.

(6) 'बखर' या शब्दाची उत्पत्ती कशी झाली ?

(7) व्याकरणाची दोन अंगे कोणती मानली जातात ?

(8) प्रमाण भाषेची व्याख्या लिहा. 16

095 095 095 095 095